सकाळ



हॅप्पी पेरेंटिग...

डॉ. सुनील गोडबोले



# हॅप्पी पेरेंटिग : थोडी गती कमी करू!

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

सकाळ: कुटुंब (01 July 2023)

आधुनिक जगात ‘सगळ्याचीच घाई’ जाणवत आहे. आधुनिक पालकसुद्धा यात कमी नाहीत. जेमतेम अडीच वर्षांचं मूल शिशुशाळेत जाऊ लागलंय. तीन-साडेतीन वर्षांत A पासून Z पर्यंत, १ ते १०० पर्यंत अंक हे यायलाच पाहिजे असं वाटतंय! पाच वर्षांचं मूल ‘वळवळ न करता, शांतपणे, एका जागी बसून शिकलं पाहिजे,’ ही पालक-शिक्षक दोघांचीही गरज बनलीय. सात-आठ वर्षांच्या मुलांना ‘परीक्षा’ सुरू होतात. गृहपाठ इतका की मुलं आई-वडिलांपेक्षाही जास्त ‘ओव्हरटाइम’ करत आहेत. हे इथंच संपत नाही. आयआयटी-मेडिकलचे फाउन्डेशन क्लासेस सातवी-आठवीत सुरू होतात. हे पुरत नाही, म्हणून बरोबरीनं खेळ, कला, संगीत यांचेही क्लासेस लहान वयापासून सुरू होतात. मुलांना ‘स्मार्ट’ करण्याची ही घाई थेट गरोदरपणात ‘बेबी ट्रेनिंग’पासून सुरू होते, मग वर्ष-दीड वर्षाच्या मुलाला, खरंतर बाळाला, बेबी आईन्स्टाईन करण्याचा ‘प्रोग्रॅम’ सुरू होतो!! शाळासुद्धा खूप सारे ‘ग्लॅमरस प्रोग्रॅम’ सुरू करतात. या सगळ्यात ‘बालपण हरवतंय!’

जगभर अनेक बालमानसशास्त्रज्ञ खूप संशोधन करून या 'शिकवण्याचा घाई'बद्दल धोक्याचे इशारे देत आहेत.

विल्यम स्टिक्सरूड आणि नेड जॉहन्सन : बालविकासाचे नैसर्गिक टप्पे अजूनही तेच आहेत. जर त्रिकोण काढायचं कौशल्य पाचव्या वर्षी विकसित होतं, तर तिसऱ्या वर्षी 'A' (एक त्रिकोणच) का काढायचा?

स्टिफन कॅमाराटा : खूप सारं ज्ञान- तेही लवकरच्या वयात शिकवण्याचा प्रयत्न- मुलांना अस्थिर, चंचल, तणावग्रस्त बनवतं!

डेव्हिड एलकाईन्ड : बालमानसशास्त्राचा जनक 'पियाजे'च्या मते वयाच्या सहाव्या-सातव्या वर्षी मेंदू 'क्लिष्ट प्रक्रिया' करू लागतो, त्या आधी गणितातली दशांश प्रणाली न शिकवलेलीच बरी.

आश्लेषा दातार : एक वर्ष शिशुशाळेत उशिरा घातली जाणारी मुलं, प्राथमिक शाळेत शिरताना जास्त चांगली कामगिरी करतात!

पालक मित्रांनो, जरा 'स्मार्ट' होऊयात! खूप लवकर, खूप सारं शिकवण्यानं भविष्य उज्ज्वल होईल, हा फक्त भ्रम आहे! पण या जीवघेण्या शर्यतीत मुलांचं बालपण संपणार हे वास्तव आहे. यातून न कळलेला धोका म्हणजे पालकत्वाचा आनंदही हरवतोय. जरा सबुरीनं घेऊयात. मुलांना त्यांच्या बालपणाचा भरपूर आनंद मिळू द्यात. बरोबरीनं आपण मोठेही परत लहान बनून 'आरामात, खूप काळ' बालपण अनुभवूयात!

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)

www.chiranjeevgodbole.com